# देशोन्नती

**वाशिम, बुधवार, दि.१४ जुलै २०२१**


# पहिली भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद १५ जुलैपासून

## एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे आयोजन

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मंगरूळपीर** ▪ एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी देवाची, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद' गुरूवार, १५ जुलै २०२१ ते रविवार, १८ जुलै २०२१ या कालावधीत ऑनलाइन आयोजित करण्यात आली आहे.

भारतीय संतसाहित्यामध्ये अनेक वैज्ञानिक व तात्त्विक तथ्यांचा उल्लेख आढळतो. अर्थात भारतीय संतांना भारतीय ज्ञानपरंपरेतून उपजलेल्या अनेक शोधांबद्दल माहिती होती, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. अनेक पाश्चात्त्य वैज्ञानिकांच्या नावे असलेले शोध हे पूर्वी भारतामध्ये लागले असल्याचे आता जगासमोर आले आहे. म्हणजेच, ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञान, भक्ती, श्रद्धा या सर्वांचा ऊहापोह करणारे संतसाहित्य ह्याचा उच्चशिक्षणात समावेश होणे ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर, सध्याच्या शिक्षणपद्धतीमध्ये संतसाहित्याचा अंतर्भाव



नाही, तसेच हे संतसाहित्य काळाच्या कसोटीवर उतरलेले असून, ते धार्मिक नाही, तर पूर्णपणे वैज्ञानिक आहे, यावर या परिषदेत विचारमंथन होईल. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. राहुल वि. कराड यांची संकल्पना आणि पुढाकारातून ही पहिली भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद संपन्न होत आहे.या परिषदेचा उद्घाटन समारंभ गुरूवार दि. १५ जुलै २०२१ रोजी दुपारी २ वा. होणार आहे. यासाठी मा. ना. श्री. नितीनजी गडकरी, केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री, हे सन्माननीय प्रमुख पाहुणे म्हणून प्रस्तावित असून, विष्णू कोकजे, माजी राज्यपाल, हिमाचल प्रदेश व ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक व ज्येष्ठ कीर्तनकार व प्रवचनकार ह.भ.प.श्री किसन महाराज साखरे, हे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष व तत्त्वज्ञ प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे 'आमचे संत तत्वज्ञ नव्हते का ?' या विषयावर बीजभाषण देणार आहेत. समारोप सत्र रविवार, दि. १८ जुलै २०२१ रोजी दुपारी ४.३० वा. होईल. या समारंभासाठी सन्माननीय प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. मोहन भागवतजी, सरसंघचालक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे प्रस्तावित असून, जगविख्यात संगणक तज्ज्ञ, पद्मभूषण डॉ. विजय भटकर, आयसीसीआरचे चेअरमन, राज्यसभेचे खासदार मा. श्री. विनय सहस्रबुद्धे, महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव सिताराम कुंटे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ दा कराड हे सन्माननीय अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत. या परिषदेमध्ये खालील सहा सत्रे होणार आहेत.(ता.प्र.)

**प्रत्येक सत्रात विशेष ठराव**

या परिषदेमध्ये इतर अनेक नामवंत शिक्षणतज्ञ, शास्त्रज्ञ, वारकरी संप्रदायातील कीर्तनकार, प्रवचनकार, संत साहित्याचे अभ्यासक आपले विचार मांडतील. या परिषदेतील प्रत्येक सत्रात विशेष ठराव पारित करून, शिक्षणाबाबत रुपरेषा ठरविण्यासाठी राज्य/केंद्र शासनाकडे पाठविण्यात येतील. अशी माहिती श्री क्षेत्र देहू संस्थानचे माजी अध्यक्ष, तत्त्वज्ञ संत श्री तुकाराम महाराज यांचे वंशज आणि पहिल्या भारतीय संत साहित्य उच्चशिक्षण परिषदेच्या संयोजन समितीचे कार्याध्यक्ष ह.भ.प.श्री. रविदास महाराज शिरसाठ, समन्वयक डॉ. संजय उपाध्ये व डॉ. महेश थोरवे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

**जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.**

तरुण भारत

अकोला, बुधवार, दि.१४ जुलै २०२१

# उद्यापासून पहिली भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद

## पुण्याच्या एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचा उपक्रम

◆ पुणे, १३ जुलै

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी देवाची, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद १५ ते १८ जुलै या कालावधीत आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आली आहे.

भारतीय संतसाहित्यामध्ये अनेक वैज्ञानिक व तात्त्विक तथ्यांचा उल्लेख आढळतो. अर्थात भारतीय संतांना भारतीय ज्ञानपरंपरेतून उपजलेल्या अनेक शोधांबद्दल माहिती होती, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. अनेक पाश्चात्त्य वैज्ञानिकांच्या नावे असलेले शोध हे पूर्वी भारतामध्ये लागले असल्याचे आता जगासमोर आले आहे. म्हणजेच, ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञान, भक्ती, श्रद्धा या सर्वांचा ऊहापोह करणारे संतसाहित्य ह्याचा उच्चशिक्षणात समावेश होणे ही काळाची गरज आहे.

त्याचबरोबर, सध्याच्या शिक्षणपद्धतीमध्ये संतसाहित्याचा अंतर्भाव नाही, तसेच हे संतसाहित्य काळाच्या कसोटीवर उतरलेले असून, ते धार्मिक नाही, तर पूर्णपणे वैज्ञानिक आहे, यावर या परिषदेत विचारमंथन होईल.

एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. राहुल वि. कराड यांची संकल्पना आणि पुढाकारातून ही पहिली भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद संपन्न होत आहे.

या परिषदेचा उद्घाटन समारंभ १५ जुलै रोजी होणार आहे. यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे प्रमुख पाहुणे म्हणून प्रस्तावित असून, माजी राज्यपाल विष्णू कोकजे, ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक हभप किसन महाराज साखरे, हे विशेष पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष व तत्त्वज्ञ प्रा. डॉ. विश्वनाथ कराड हे 'आमचे संत तत्वज्ञ नव्हते का?' या विषयावर बीजभाषण देणार आहेत.

◀*(तभा वृत्तसेवा)*

जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.

सामना
पुणे, बुधवार, दि.१४ जुलै २०२१

# एमआयटीतर्फे 'भारतीय संत साहित्य उच्चशिक्षण परिषदे'चे आयोजन

**एमआयटी** वर्ल्डपीस युनिव्हर्सिटीतर्फे १५ ते १८ जुलै या कालावधीत 'भारतीय संत साहित्य उच्चशिक्षण परिषद' आयोजित केली आहे. ऑनलाइन पद्धतीने चार दिवस चालणाऱ्या या परिषदेमध्ये प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ, शास्त्रज्ञ, वारकरी संप्रदायातील कीर्तनकार, प्रवचनकार, संत साहित्याचे अभ्यासक आपले विचार मांडणार आहेत. या परिषदेचे गुरुवारी (दि. १५) दुपारी २ वाजता उद्‌घाटन करण्यात येणार आहे. यावेळी केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर, माजी राज्यपाल विष्णू कोकजे, ज्येष्ठ कीर्तनकार ह.भ.प. किसन महाराज साखरे, एमआयटी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ कराड हे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती समन्वयक डॉ. संजय उपाध्ये यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जागृत
Email:jagrutjanpravas@gmail.com
जनप्रवास
उस्मानाबाद, बुधवार, दि.१४ जुलै २०२१

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी,पुणेतर्फे

# पहिली भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद १५ जुलै पासून




**पुणे**–एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी–देहू परिसर विकास समिती, आळंदी देवाची, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद गुरूवार, दि.१५ जुलै २०२१ ते रविवार, दि.१८ जुलै २०२१ या कालावधीत ऑनलाइन आयोजित करण्यात आली आहे.

भारतीय संतसाहित्यामध्ये अनेक वैज्ञानिक व तात्त्विक तथ्यांचा उल्लेख आढळतो. अर्थात भारतीय संतांना भारतीय ज्ञानपरंपरेतून उपजलेल्या अनेक शोधांबद्दल माहिती होती, असे म्हटल्यास वावगे ठरु नये. अनेक पाश्चात्त्य वैज्ञानिकांच्या नावे असलेले शोध हे पूर्वी भारतामध्ये लागले असल्याचे आता जगासमोर आले आहे. म्हणजेच, ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञान, भक्ती, श्रद्धा या सर्वांचा ऊहापोह करणारे संतसाहित्य ह्याचा उच्चशिक्षणात समावेश होणे ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर, सध्याच्या शिक्षणपद्धतीमध्ये संतसाहित्याचा अंर्तभाव नाही, तसेच हे संतसाहित्य काळाच्या कसोटीवर उतरलेले असून, ते धार्मिक नाही, तर पूर्णपणे वैज्ञानिक आहे, यावर या परिषदेत विचारमंथन होईल.

एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. राहुल वि. कराड यांची संकल्पना आणि पुढाकारातून ही पहिली भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद संपन्न होत आहे.या परिषदेचा उद्घाटन समारंभ गुरूवार दि.१५ जुलै २०२१ रोजी दुपारी २ वा. होणार आहे. यासाठी मा.ना.श्री. नितीनजी गडकरी, केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री, हे सन्माननीय प्रमुख पाहुणे म्हणून प्रस्तावित असून, मा. श्री. विष्णू कोकजे, माजी राज्यपाल, हिमाचल प्रदेश व ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक व ज्येष्ठ कीर्तनकार व प्रवचनकार ह.भ.प.श्री किसन महाराज साखरे, हे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष व तत्त्वज्ञ प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे आमचे संत तत्वज्ञ नव्हते का? या विषयावर बीजभाषण देणार आहेत.समारोप सत्र रविवार, दि. १८ जुलै २०२१ रोजी दुपारी ४.३० वा. होईल. या समारंभासाठी सन्माननीय प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. मोहन भागवतजी, सरसंघचालक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे प्रस्तावित असून, जगविख्यात संगणक तज्ञ, पद्मभूषण डॉ. विजय भटकर, आयसीसीआरचे चेअरमन, राज्यसभेचे खासदार मा. श्री. विनय सहस्त्रबुद्धे, महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव सिताराम कुंटे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ दा कराड हे सन्म ननीय अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या परिषदेमध्ये खालील सहा सत्रे होणार आहेत.पहिले सत्रः संतसाहित्य – समृद्ध जीवन जगण्याचे आधुनिक शास्त्र वक्तेः डॉ. मिलिंद जोशी, ह.भ.प.श्री ज्ञानेश्वर महाराज वाबळे. ह.भ.प.श्री जगन्नाथ महाराज पाटील, ह.भ.प.श्री. गुरूबाबा महाराज औसेकर, ह.भ.प.श्री. प्रकाश महाराज बोधले, ह.भ.प.श्री. अच्यूत महाराज दस्तापूरकर व ह.भ.प.श्री. रामकृष्ण लहवितकर दुसरे सत्रः. वारकरी संप्रदाय विचार : आधुनिक की कालबाह्य? वक्तेः इंद्रजीत भालेराव, भागवताचार्य ह.भ.प.श्री. माधव महाराज राठी, अ‍ॅड. जयवंत महाराज बोधले, ह.भ.प.श्री. योगीराज महाराज गोसावी व ह.भ.प.श्री. उध्दव महाराज मंडलिक आणि हरीहर महाराज दिवेगावकर तिसरे सत्रः भारतीय संतविचाराचे खच्चीकरण इंग्रजी शिक्षणपद्धतीने केले काय? वक्तेः ह.भ.प.श्री उल्हास दादा पवार, कोल्हापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिंगबर तु. शिर्के, ह.भ.प.श्री चंद्रशेखर महाराज देगलूरकर, श्री. चारुदत्त आफळे, डॉ. विवेक सावंत, श्री. भावार्थ देखणे, डॉ. पुष्पिता अवस्थी व ह.भ.प.श्री चंद्रकांत महाराज वांजळे चौथे सत्रः संत आणि आरोग्य व्यवस्थापन वक्तेः डॉ. बालाजी तांबे, डॉ. तात्याराव लहाने, ह.भ.प.श्री अर्जुन महाराज लाड, ह.भ.प.श्री मुकुंद महाराज जाडदेवळेकर, बाळासाहेब बडवे, डॉ. विश्वास सापत्नेकर, ह.भ.प.श्री केशव महाराज उखळीकर. पाचवे सत्रः आमच्या तत्त्वज्ञ संतांना धार्मिक कोणी ठरविले?

वक्तेः ह.भ.प.श्री संजय महाराज धोंडगे, ह.भ.प.श्री तुकाराम महाराज गरूड ठाकुरबुवा–दैठणेकर, डॉ. विजय भटकर, महामंडलेश्वर श्री श्री १००८ ईश्वरानंद ब्रह्मचारी श्री उत्तमस्वामीजी महाराज, पं. वसंतराव गाडगीळ, डॉ. रामचंद्र देखणे, डॉ. सदानंद मोरे, डॉ. विजय कुमार फड, श्री उत्तम स्वामीजी महाराज व ह.भ.प.श्री. सुदाम महाराज पाणेगावकर सहावे सत्रः भारतीय शिक्षण अभ्यासक्रमात भारतीय संत गौण का? ह.भ.प.श्री चैतन्य महाराज देगलूरकर, ह.भ.प.श्री दिनकर शास्त्री भुकेले, एसएनडीटी विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. शशिकला वंजारी, डॉ. अभय टिळक, आचार्य स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वती महाराज, डॉ. श्रीनिवास वरखेडी आणि ह.भ.प.श्री धर्मराज हांडे.या परिषदेमध्ये इतर अनेक नामवंत शिक्षणतज्ञ, शास्त्रज्ञ, वारकरी संप्रदायातील कीर्तनकार, प्रवचनकार, संत साहित्याचे अभ्यासक आपले विचार मांडतील. या परिषदेतील प्रत्येक सत्रात विशेष ठराव पारित करून, शिक्षणाबाबत रुपरेषा ठरविण्यासाठी राज्य/केंद्र शासनाकडे पाठविण्यात येतील.

अशी माहिती श्री क्षेत्र देहू संस्थानचे माजी अध्यक्ष, तत्त्वज्ञ संत श्री तुकाराम महाराज यांचे वंशज आणि पहिल्या भारतीय संत साहित्य उच्चशिक्षण परिषदेच्या संयोजन समितीचे कार्याध्यक्ष ह.भ.प.श्री. रविदास महाराज शिरसाठ, समन्वयक डॉ. संजय उपाध्ये व डॉ. महेश थोरवे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

श्री शामराव पाटील पत्रकारीता महाविद्यालय, पुरस्कृत....
Postal R. No. L2/RNP/OSD/143/2017-19
Email : dailyaapleman2004@gmail.com
सांज दैनिक
आपलं मन
APALAMAN DAILY EVENING

**लातूर, मंगळवार, दि.१३ जुलै २०२१**

# एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी,पुणेतर्फे पहिली भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद १५ जुलैपासून

पुणे : एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी देवाची, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद' गुरूवार, दि. १५ जुलै २०२१ ते रविवार, दि. १८ जुलै २०२१ या कालावधीत ऑनलाइन आयोजित करण्यात आली आहे.

भारतीय संतसाहित्यामध्ये अनेक वैज्ञानिक व तात्त्विक तथ्यांचा उल्लेख आढळतो. अर्थात भारतीय संतांना भारतीय ज्ञानपरंपरेतून उपजलेल्या अनेक शोधांबद्दल माहिती होती, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. अनेक पाश्चात्त्य वैज्ञानिकांच्या नावे असलेले शोध हे पूर्वी भारतामध्ये लागले असल्याचे आता जगासमोर आले आहे. म्हणजेच, ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञान, भक्ती, श्रद्धा या सर्वांचा ऊहापोह करणारे संतसाहित्य ह्याचा उच्चशिक्षणात समावेश होणे ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर, सध्याच्या शिक्षणपद्धतीमध्ये संतसाहित्याचा अंतर्भाव नाही, तसेच हे संतसाहित्य काळाच्या कसोटीवर उतरलेले असून, ते धार्मिक नाही, तर पूर्णपणे वैज्ञानिक आहे, यावर या परिषदेत विचारमंथन होईल. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. राहुल वि. कराड यांची संकल्पना आणि पुढाकारातून ही पहिली भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद संपन्न होत आहे. या परिषदेचा उद्घाटन समारंभ गुरूवार दि. १५ जुलै २०२१ रोजी दुपारी २ वा. होणार आहे. यासाठी मा. ना. श्री. नितीनजी गडकरी, केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री, हे सन्माननीय प्रमुख पाहुणे म्हणून प्रस्तावित असून, मा. श्री. विष्णू कोकजे,




माजी राज्यपाल, हिमाचल प्रदेश व ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक व ज्येष्ठ कीर्तनकार व प्रवचनकार ह.भ.प.श्री किसन महाराज साखरे, हे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष व तत्त्वज्ञ प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे 'आमचे संत तत्वज्ञ नव्हते का?' या विषयावर बीजभाषण देणार आहेत.

समारोप सत्र रविवार, दि. १८ जुलै २०२१ रोजी दुपारी ४.३० वा. होईल. या समारंभासाठी सन्माननीय प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. मोहन भागवतजी, सरसंघचालक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे प्रस्तावित असून, जगविख्यात संगणक तज्ञ, पद्मभूषण डॉ. विजय भटकर, आयसीसीआरचे चेअरमन, राज्यसभेचे खासदार मा. श्री. विनय सहस्रबुद्धे, महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव सिताराम कुंटे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ दा कराड हे सन्माननीय अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या परिषदेमध्ये खालील सहा सत्रे होणार आहेत. पहिले सत्रः संतसाहित्य - समृद्ध जीवन जगण्याचे आधुनिक शास्त्र वक्तेः डॉ. मिलिंद जोशी, ह.भ.प.श्री ज्ञानेश्वर महाराज वाबळे. ह.भ.प.श्री जगन्नाथ महाराज पाटील, ह.भ.प.श्री. गुरुबाबा महाराज औसेकर, ह.भ.प.श्री. प्रकाश महाराज बोधले, ह.भ.प.श्री. अच्यूत महाराज दस्तापूरकर व ह.भ.प.श्री. रामकृष्ण लहवितकर दुसरे सत्रः. वारकरी संप्रदाय विचार : आधुनिक की कालबाह्य? वक्तेः इंद्रजीत भालेराव, भागवताचार्य ह.भ.प.श्री. माधव महाराज राठी, ॲड. जयवंत महाराज बोधले, ह.भ.प.श्री. योगीराज महाराज गोसावी व ह.भ.प.श्री. उध्दव महाराज मंडलिक आणि हरीहर महाराज दिवेगावकर तिसरे सत्रः भारतीय संतविचाराचे खच्चीकरण इंग्रजी शिक्षणपद्धतीने केले काय? वक्तेः ह.भ.प.श्री उल्हास दादा पवार, कोल्हापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर तु. शिर्के, ह.भ.प.श्री चंद्रशेखर महाराज देगलूरकर, श्री. चारुदत्त आफळे, डॉ. विवेक सावंत, श्री. भावार्थ देखणे, डॉ. पुष्पिता अवस्थी व ह.भ.प.श्री चंद्रकांत महाराज वांजळे चौथे सत्रः संत आणि आरोग्य व्यवस्थापन वक्तेः डॉ. बालाजी तांबे, डॉ. तात्याराव लहाने, ह.भ.प.श्री अर्जुन महाराज लाड, ह.भ.प.श्री मुकुंद महाराज जाडदेवळेकर, बाळासाहेब बडवे, डॉ. विश्वास सापत्नेकर, ह.भ.प.श्री केशव महाराज उखळीकर. पाचवे सत्रः आमच्या तत्त्वज्ञ संतांना धार्मिक कोणी ठरविले? वक्तेः ह.भ.प.श्री संजय महाराज धोंडगे, ह.भ.प.श्री तुकाराम महाराज गरूड ठाकुरबुवा-दैठणेकर, डॉ. विजय भटकर, महामंडलेश्वर श्री श्री १००८ ईश्वरानंद ब्रह्मचारी श्री उत्तमस्वामीजी महाराज, पं. वसंतराव गाडगीळ, डॉ. रामचंद्र देखणे, डॉ. सदानंद मोरे, डॉ. विजय कुमार फड, श्री उत्तम स्वामीजी महाराज व ह.भ.प.श्री. सुदाम महाराज पाणेगावकर सहावे सत्रः भारतीय शिक्षण अभ्यासक्रमात भारतीय संत गौण का?

ह.भ.प.श्री चैतन्य महाराज देगलूरकर, ह.भ.प.श्री दिनकर शास्त्री भुकेले, एसएनडीटी विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. शशिकला वंजारी, डॉ. अभय टिळक, आचार्य स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वती महाराज, डॉ. श्रीनिवास वरखेडी आणि ह.भ.प.श्री धर्मराज हांडे. या परिषदेमध्ये इतर अनेक नामवंत शिक्षणतज्ञ, शास्त्रज्ञ, वारकरी संप्रदायातील कीर्तनकार, प्रवचनकार, संत साहित्याचे अभ्यासक आपले विचार मांडतील. या परिषदेतील प्रत्येक सत्रात विशेष ठराव पारित करून, शिक्षणाबाबत रुपरेषा ठरविण्यासाठी राज्य/केंद्र शासनाकडे पाठविण्यात येतील. अशी माहिती श्री क्षेत्र देहू संस्थानचे माजी अध्यक्ष, तत्त्वज्ञ संत श्री तुकाराम महाराज यांचे वंशज आणि पहिल्या भारतीय संत साहित्य उच्चशिक्षण परिषदेच्या संयोजन समितीचे कार्याध्यक्ष ह.भ.प.श्री. रविदास महाराज शिरसाठ, समन्वयक डॉ. संजय उपाध्ये व डॉ. महेश थोरवे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

**जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.**

सुराज्य
सोलापूर
सोलापूर, बुधवार, दि.१४ जुलै २०२१

# शिक्षण आणि संत साहित्य

**TODAYS BLOG**

उच्च शिक्षणामध्ये सध्या संत साहित्याचा समावेश असणे का गरजेचे आहे? आज साऱ्या जगाने विज्ञानाची कास धरली आहे. तरी सुद्धा मानवी जीवन उन्नत होण्याऐवजी उद्ध्वस्त होण्याचीच भिती वाटू लागली आहे.

याचे कारण विज्ञानवाद, भोग प्रधान, अर्थकाम प्रधान भोगाची वाद करणारा आणि भोगाच्या लालसेने विवेक निर्णय शुन्याला देणाराच जास्त समाज निर्माण होतो की काय? अशी भिती वाटू लागली आहे. हा चाललेला अविवेक कायद्याने व दुःख कळवही थांबत नाहीत. मनुष्य हा अर्थकाम प्रधान, भोग प्रधान आणि सत्ता प्रधान या गोष्टीशी अतिशय निगडीत झालेला आहे. या गोष्टी खऱ्या अर्थाने मानवी जीवनाची अस्वस्थता वाढविणारी आहेत. तेच आज आपल्याला प्रकर्षाने पहावला मिळत आहे. म्हणून खऱ्या अर्थाने मानवी जीवनाची ही अस्वस्थता पूर्णपणे घालवून सुख, समाधान, शांती संत साहित्यातच दिसून येते, म्हणून सध्याच्या फक्त शालेय अभ्यासक्रमात संत साहित्याचा मर्यादित स्वरूपामध्ये समावेश असून चालणार नाही. तर तो उच्च शिक्षणामध्ये ही प्रकर्षाने जाणीवपूर्वक समाविष्ट केला पाहिजे. कारणही खऱ्या अर्थाने काळाची गरज आहे. मानवाचे स्थिर आणि स्वस्थ समाधान हे वैज्ञानिक सुधारणेने कधीच होणे शक्य नाही. त्या करिता संत साहित्याचा आधारच घ्यावा लागेल. त्या आधारेच आपल्याला शाश्वत उन्नती खऱ्या अर्थाने करावी लागेल. आज या महासत्ता देश बनविणाऱ्या उच्च शिक्षित तरुणांना खरी गरज आहे. ती या उच्च शिक्षणाबरोबर कसदार विचारांची.

कारण आजचा तरुण शिक्षणाने उच्च झाला तरी एकीकडे मनाने दुबळा झालेला दिसतो. मनाने दुबळी झालेली उच्च शिक्षित माणसेही कुविचाराने गेलेली दिसतात. कदाचित ही आत्महत्येलाही प्रवृत्त झालेली दिसतात. म्हणून सतत मन प्रसन्न राहील असा विचार फक्त संत साहित्यात पहावला मिळतो. मन करारे प्रसन्न। सर्व सिद्धीचे कारण।। किंवा मनी आठवती । मनाचिये गुंती।। मन लावा एकतरी साधुसंगे।

आत्महत्या करणाऱ्या व्यक्तिवर महाराजांनी मोठा प्रहार केला. न लगे यावा जीव सहजची जाणार।। आहे तो विचार जाणा काही ।। मरण जो याने गाढवाचा बाळ। बोलिजे चांडाळ दुष्ट त्याशी।। महाराज म्हणतात, एखाद्या मनाच्या विरुध्द घटलेला कष्टातून जीव देण्याचे अजिबात कारण नाही. आपल्याला सहज लाभलेले हे देहाचे निधान स्वतः हून टाकू पहात आहे. त्याचे हित कसे होणार हा सर्वांना धैर्यत बजाविणारा संतांचा विचार आहे. हे प्रकर्षाने उच्च शिक्षणामध्ये आले पाहिजे. संत हे दैववादी विचाराचे नव्हते. तर ते प्रयत्नवादी होते ते आपणाला त्यांच्या विचारातून दिसून येते. आज अभ्यासाचे ज्यांना महत्त्व कळाले तेच उच्चशिक्षित होऊ शकतात. त्या अभ्यासाच्या सातत्याने काय होऊ शकत नाही ते पण संत तुकाराम महाराज सांगतात. असाध्य ते साध्य करिता सायास। कारण अभ्यास तुका म्हणे।। अभ्यास म्हणजे चांगल्या गोष्टीचा ध्यास (प्रयत्न) एखादी चांगली गोष्ट पूर्ण नाही झाली तर पुन्हा पुन्हा प्रयत्न करणे म्हणजे अभ्यास.

अभ्यासाचे महत्त्व संत साहित्यातच पहावला मिळते. ओले मूळ भेदी खडकाचे अंग। अभ्यासासी सांग कार्यसिद्धी।। वृक्षाचे मूळ हळूहळू खडक सुध्दा फोडते. तसे अभ्यासाने कोणतेही कार्य सिद्ध होते. तेच तरुण पिढीला, उच्च शिक्षिताला प्रयत्नवादाचा उपदेश केलेला दिसतो. आळशी माणसाचा संत धिक्कार करतात. आळशीयाचे अंतर कुडे। जैसे पडे निष्काम।। आळशी मनुष्याला प्रगतीची इच्छा नसते म्हणून संत हे नेहमी आळशाचा तिरस्कार व प्रयत्नपूर्वक अभ्यास करणाऱ्याचा पुरस्कार करतात. त्यांनी आपल्या जीवनातील अनेक गोष्टींवर प्रकर्षाने प्रकाश टाकलेला दिसतो. त्यामध्ये विज्ञान, राजकारण, अर्थकारण, समाजकारण व्यसनमुक्ती, सहिष्णुता जातीवाद, धर्मभेद, आरोग्य, अंधश्रद्धा या गोष्टी प्रकर्षाने पहावला मिळतात. संत हे खरे तत्त्वज्ञ आहेत. त्यांचा संपूर्ण विचार एका छोटयाशा लेखामध्ये देणे शक्य नाही. ते शब्दातीत आहे. तरी यतू जमेल तेवढा प्रयत्न केलेला आहे.

-ह.भ.प.श्री. बापूसाहेब मोरे (देहकर)

दैनिक
सत्यमत
लातूर, बुधवार, दि.१४ जुलै २०२१

# शिक्षणाचे पूर्णत्व आणि संत साहित्य : डॉ. रामचंद्र देखणे

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी आणि श्री क्षेत्र आळंदी देहू विकास परिसर समिती यांचे वतीने आयोजित पहिली भारतीय संत साहित्य उच्चशिक्षण परिषदेच्या माध्यमातून या विषयावर प्रकाश टाकण्याचे काम होत आहे, ही अतिशय आनंदाची बाब आहे. या परिषदेचा मुख्य उद्देश, भारतीय संत साहित्याचा उच्च शिक्षणात समावेश काळाची गरज, असा आहे. उपरोक्त विषयाचा शासनाने गांभीर्यपूर्वक विचार करून शिक्षण व्यवस्थेत योग्य तो बदल केला, तर नक्कीच भावी पिढीची जीवनपद्धती सुधारेल असे दिसून येते. मा. राहुल कराड यांनी अतिशय दूरदृष्टीपूर्वक या परिषदेचे आयोजन करून सर्वांना एक चांगली संधी प्राप्त करून दिली आहे.

शिक्षण प्रणालीमध्ये संत साहित्याचा अंतर्भाव व्हावा, या विषयावर चर्चा करतांना प्रथम संत साहित्याचे व्यापकत्व समजावून घ्यावे लागेल. संत साहित्याने किंवा संत विचाराने महाराष्ट्राला काय दिले, या प्रश्नाचे उत्तर मात्र या साहित्याने काय दिले नाही असेच द्यावे लागेल. मराठी भाषेच्या नगरीत ब्रह्मविद्येचा सुकाळ करून ज्ञानेश्वर माऊलींनी भागवत संप्रदायाला अध्यात्मनिष्ठ मानवतावादाची बैठक मिळवून दिली आणि सकल संतांनी आपल्या अभंगांदी साहित्यातून तो वैश्विक मानवतावाद संपूर्ण जगाला दिला. भाषेच्या मर्यादेमुळे जरी ते महाराष्ट्रापुरते मर्यादित राहिले तरी विचार तत्वाच्या अभिव्यक्तीने ते वैश्विक ठरले आहे. विचारांचे ओज, रचनेचा प्रसाद आणि सुबोधाची माधुरी यामुळे संत साहित्य हे जसे एकीकडे देशियेचिये लावण्य ठरले आहे, तसेच भक्तीतत्वाबरोबर, मानवी जीवनमुल्ये विज्ञानदृष्टी, पर्यावरण जागृती, सामाजिक नैतिकता, विकासात्मक दृष्टीकोन, विवेक प्रामाण्यावाद, सामाजिक एकरूपता, लोकसंग्रहात्मक भावना अशा विविध दृष्टीकोनातून संत साहित्याने सामाजिक जाणिवा जपल्या आहेत. भक्ती, नीति, श्रध्दा, सत विचारदर्शन हा तर संत साहित्याचा महत्वाचा भाग आहे. पण ज्या मानवी मूल्यांमधून सामाजिक जाणिव उभे राहिले आणि समृध्द होते असे प्रवृत्तीवादी दर्शन संत साहित्यातून ठायी ठायी आढळते. अशी अनेक उदाहरणे संत साहित्यातून देता येतील. ज्ञानदेवांनी चौथ्या अध्यायात म्हटले आहे.



आणि उदयस्ताचेनि प्रमाणे ।
जैसे न चालता सूर्याचे चालणे ।।

सूर्य उदयाला येता आणि अस्ताला जातो त्यामुळे तो एका प्रमाणावरून चाललेला भासतो, पण तो चालत नाही तर सूर्य स्थिरच आहे. पृथ्वी त्याचा भोवती फिरते आहे. कोपर्निकसने सुध्दा सूर्य पृथ्वी भोवती फिरते आहे. असे म्हटले होते पण ज्ञानदेवांनी त्याचे ही मत केव्हाच खोडून काढले आहे. आज आदर्श नगररचनेची संकल्पना विकास प्रक्रियेतील महत्वाचा भाग बनली आहे पण ज्ञानदेवांनी

नगरेचि रचावी।
जलाशये निर्मावी।
महावने लावावी, नानाविध।।

असे ठामपणे मांडून नगरविकासाच्या संकल्पनेचाही एका अर्थाने पाया घातला होता. जीवन जगताना निसर्गात वावरतांना अवती भोवती दिसणारे जाणवणारे पर्यावरणाचे घटक सर्वांच्या परिचयाचे आहेत. वृक्ष वल्ली, डोंगर, नदी, फळे, फुले, पशु, गाई, गुरे, वने, अरण्ये, पाऊस, हया पर्यावरणाच्या घटकांना कधी उपमा, कधी रूपक, कधी सिद्धांत तर कधी दृष्टांत अशा स्वरूपात आपल्या वाङ्मयातून ठायी ठायी मांडून पर्यावरणाची नवी दृष्टी दिली आहे. ज्ञानदेवांनीच म्हटल्याप्रमाणे,

जयाचेनि उजाळे, उघडती बुद्धीचे डोळे

बुद्धीचे डोळे उघडणारे ज्ञानही दिले आणि उघडविणारे विज्ञान ही दिले. परंतु हया भूमिकेतून संत साहित्याकडे पाहिले गेले नाही. धार्मिक, आध्यात्मिक, भक्ती प्रधान म्हणूनच ते प्रामुख्याने मांडले गेले.

शिक्षण हे कधी एकांगी नसते. ते सर्वस्पर्शी आणि सर्वदर्शी असते. व्यक्तीच्या बैद्धिक, मानसिक व सांस्कृतिक विकासाला कारण होणारे जे ज्ञान ते शिक्षण होय, अशी शिक्षणाची व्यापक अर्थाने व्याख्या केली जाते. ज्यामुळे हात हरकामी, बुध्दी सर्वगामी आणि हृदय सर्व प्रेमी होते. ते खरे शिक्षण होय. त्यासाठी महात्मा गांधींनी शिक्षणामध्ये नीतिप्रधान चिद्वाद आवश्यक असल्याचे म्हंटले आहे. तर थोर शिक्षणतज्ञ आणि भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी व्यक्तीचा आणि सामाजाचा सर्वांगिण विकास होण्यासाठी शिक्षणात नैतिक सदाचरणाचा भाग आवशयक असल्याचे म्हटले आहे. आज उच्च शिक्षणात शिक्षणाच्या अनेक विद्या शाखा उघडल्या आहेत. अभ्यासक्रमानुसार शिक्षण दिले जात आहे. पण शिक्ष्यातून मूल्याधिष्ठित नैतिकता हरवत चाललेली आहे. खूप शिकलेला माणूस हा कुटुंबापासून समाजापासून दूर दूर जातोय. आत्मकेंद्री वृत्तीने त्याच्या भावनाही बोथट होत चालल्या आहेत.

बुध्दीवान माणूस भावनाशून्य असेल तर त्याची बौध्दिक वृत्ती आणि ज्ञान हे शुष्क ठरते. शिक्षण म्हणजे पूर्णत्वाचा अविष्कार परंतु जीवनमूल्यांशिवाय हे पूर्णत्व येणार नाही. आणि शिक्षण खर्या अर्थाने अपूर्ण राहील. संतांचे भक्तीशास्त्रही एका अर्थाने नीतिशास्त्रच आहे. मूल्यांची जाणिव करून देणे आणि ती मूल्ये जपणे हा कोणत्याही शिक्षणप्रणालीचा आत्मा आहे. हे संपूर्ण जगातील शिक्षण तज्ज्ञांनी मान्य केले आहे. तर जीवनमूल्ये मांडणे आणि जगविणे संतसाहित्यांचा प्राण आहे. म्हणून आजच्या शिक्षणप्रणालीत संत प्रणित मूल्यविचारांची मांडणी झाली तरच तस्मात ज्ञानमयो भव ह्या योगवाशिष्ठातील वचानप्रमाणे शिक्षणाने ज्ञानमय होण्याची प्रक्रीया खर्या अर्थाने पूर्ण होईल.

– डॉ. रामचंद्र देखणे
सी ३/ ४ डीएसके चिंतामणी
५१३ शनिवार पेठ, पुणे: ३०
मो. ९५०३२६३०४६